# सहकार पुरस्कार 2015-16

*****

सन 2015-16 मध्ये सहकार क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या सहकारी संस्थांना पुरस्कार देऊन त्यांचा उचित गौरव करण्यासाठी शासनाने गतवर्षीप्रमाणे **“सहकार पुरस्कार”** देण्याचे ठरविले आहे.

तरी इच्छुक सहकारी संस्थांनी, त्यानुसार सविस्तर प्रस्ताव तयार करुन ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे त्या तालुक्याचे संबंधीत सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांच्या कार्यालयात **दि. 15 सप्टेबर 2016 ते 07 ऑक्टोबर 2016** पर्यंत सादर करावेत.

यासंदर्भातील अधिक माहितीसाठी संस्थांनी संबंधीत सहाय्यक निबंधक / जिल्हा उपनिबंधक / विभागीय सहनिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन सहकार विभागामार्फत करण्यात येत आहे.

**संपर्क तपशिल - https://sahakarayukta.maharashtra.gov.in/1078/Admin-Wing**

*****

| क्र. | दिनांक व कालावधी | सहकार पुरस्कार सन 2015-16 कार्यक्रमाचा टप्पा |
|---|---|---|
| 1 | 14.09.2016 | सहकार पुरस्कार सन 2015-16 कार्यक्रमास प्रसिध्दी देणे. |
| 2 | 15.09.2016 ते 07.10.2016 | सहकारी संस्थांनी आपले पुरस्कारासाठीचे प्रस्ताव ज्या तालुक्यात त्यांचे मुख्यालय आहे त्या तालुक्याचे तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांचेकडे सादर करणे |
| 3 | 08.10.2016 ते 15.10.2016 | तालुका सहाय्यक निबंधक / उपनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधक यांचेकडे छाननी करुन प्रस्ताव सादर करणे |
| 4 | 16.10.2016 ते 31.10.2016 | जिल्हा उपनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव विभागीय सहनिबंधक यांचेकडे सादर करणे |
| 5 | 01.11.2016 ते 15.11.2016 | विभागीय सहनिबंधक समितीने छाननी करुन प्रस्ताव सहकार आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे |
| 6 | 16.11.2016 ते 30.11.2016 | सहकार आयुक्त स्तरावरील समितीने प्रस्ताव छाननी करुन शासनाकडे पाठविणे |

*****